ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी व आव्हाने

*** डॉ. दयाराम दुधाराम पवार,**

** सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मु.वि. नाशिक*

**प्रस्तावना:**

आधुनिक भारतात नवीन शैक्षणिक धोरणाला विशेष महत्त्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे रचनात्मक केला आणि नवविचारांना महत्व प्राप्त होणार आहे. शिक्षणातून केवळ आकलन क्षमताच नाही तर संख्याज्ञान मूलभूत क्षमता उच्च दर्जाच्या तार्कीक समस्या निराकरण क्षमता तसेच सामाजिक नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकास शिक्षणातून झाला पाहीजे. शिक्षणाच्या अशा व्यवस्थेतून भारताचा विकास योग्य प्रकारे व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे एकविसाव्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. या धोरणाची ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतावर उपाययोजना करण्याबरोबर विद्यार्थ्यांच्या मनात नवनवीन गोष्टी शिकण्याची रुची निर्माण करणे होय. त्याद्वारे विद्यार्थी स्वतःच्या क्षमतेवर स्वतःाःःचे भविष्य घडवू शकतील. त्या व्यतिरिक्त आपल्या मातृभाषेला महत्त्व प्राप्त करून देणे हाही एक उद्देश होय. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टीतून भारतःाने विकसीत केलेली मूल्य जोपासणे, संवर्धन करणे तसेच सर्वांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देणे व त्याद्वारे एक जागतिक ज्ञान महासत्ता बनवून भारताचे एक न्याय आणि चैतन्यमय ज्ञान समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात प्रत्यक्षपणे योगदान देणारी अशी शिक्षण व्यवस्था निर्माण करणे हा या शैक्षणिक धोरणाचा उद्देश आहे.

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

वरील शैक्षणिक धोरणाचे ध्येय व उद्दिष्टे साध्य करणेसाठी शिक्षणक्रम संरचना अभ्यासक्रम व अध्यापन रचना ५+३+ ३+४ अशी करण्यात आली आहे. या मांडणीनुसार सुरुवातीचे पाच वर्षे हे फाउंडेशन स्वरूपात मांडण्यात आलेले आहे. त्यांचा उद्देश उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करणे हा पायाभूत स्तर आहे. हयातील अभ्यासक्रम लवचिक बहुस्तरीय खेळ उपक्रमावर आधारित शिक्षणाचा समावेश यामध्ये केला आहे. यामध्ये प्रायमरीचे तीन आणि पहिली व दुसरी वर्गाचा समावेश असणार आहे. ह्या नवीन मांडणीनुसार मुलांचा सर्वांगीण विकास होईल. आनंदाने शिक्षण घेतील व मुलांच्या दप्तरांची ओझे कमी होण्यास मदत होईल. नंतरच्या मांडणीत तिसरी चौथी व पाचव्या वर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे. यात त्यांना

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

गणित कला सामाजिक विज्ञान आणि विज्ञान विषयांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. ह्याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी तयार करणे हा त्यामागे उद्देश आहे. यानंतरच्या शैक्षणिक स्तरात सहावी सातवी व आठ या वर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे. या स्तरातील विद्यार्थ्यांना एक निश्चित अभ्यासक्रमाद्वारे शिक्षण दिल्या जाणार आहे. तसेच त्यांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण दिले जाईल. त्यांना कोडीगचेही शिक्षण दिल्या जाणार आहे. त्याद्वारे त्यांना कमी वयातच सॉफ्टवेअर , ॲप्स बनविणे यासारख्या विविध बाबी शिकण्यास मदत होणार आहे. त्यानंतरच्या स्तरात नववी दहावी अकरावी आणि बारावी वर्ग शेवटच्या स्तरात समाविष्ट असतील. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या विषयांमध्ये शिक्षण घेता येईल. या प्रकारे नवीन शैक्षणिक धोरणाद्वारे केवळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात बदलाव करण्यात येईल तसेच त्यांच्या शिक्षणाच्या माध्यमातून देखील सुधार करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणातील लवचिक अभ्यासक्रमासह व्यापक आधारावर सर्वसमावेशक पदवी पूर्ण शिक्षण विद्यार्थी पूर्ण करणार आहे. विषयांचे सर्जनशील संयोजन करून व्यावसायिक एकत्रीकरण करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्यांना शिक्षण घेता येणार आहे. किंवा इतर विषय शिकता येणार आहे. तसेच काही कारणास्तव थांबलेले शिक्षण प्रवेश घेवून पुर्ण करण्याची मुभा असणार आहे. विद्यार्थ्याने संपादन केलेल क्रेडीट विद्यार्थ्यांच्या डिजिटल स्वरूपात साठवण्यासाठी अकॅडमी बँक असणार आहे. त्यात विद्यार्थ्यांचे विविध स्तरावरील गुण त्यांच्या शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या वर्षी जोडले जातील विद्यार्थ्यांसाठी बहुविद्याशाखीय शिक्षण उपलब्ध असेल. तसेच विद्यापीठ स्तरावर संशोधची क्षमता विकसीत करणेसाठी एनआरएफ निर्मिती केली जाणार आहे. त्याद्वारे संशोधनाला चालना देण्यासाठी तसेच संशोधन क्षमता विकसित करण्यासाठी व्यवस्था असणार आहे. उच्च शिक्षणात सार्वजनिक व खाजगी या दोन्ही संस्था समान नियमाद्वारे नियंत्रित असतील.तसेच महाविद्यालयांची स्वायत्तता देण्यासाठी टप्प्याटप्प्याने प्रक्रिया देखील विकसित विकसित केली जात आहे

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संधी :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक सर्वसमावेशक धोरण आहे जे भारतातील शिक्षणाच्या भविष्यासाठीच्या दृष्टिकोनाची रूपरेषा देते.

**विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास:**

नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आलेला आहे ज्यामध्ये संज्ञात्मक सामाजिक शारीरिक भावनिक विकासाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यासाठी विविध टप्प्यावर क्षमता विकसीत करणेसाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**अभ्यासक्रम लवचिकता :**

नवीन शैक्षणिक धोरणात लवचिक अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी अभिरुचीनुसार विषय निवडण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

**बहुविद्याशाखीय शिक्षणास प्रोत्साहन :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थी विविध विषयात व विविध क्षेत्रांमध्ये आपले शिक्षण पूर्ण करू शकणार आहेत.

**तंत्रज्ञानधिष्ठीत शिक्षण :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तंत्रज्ञानाची परिवर्तनीय क्षमता ओळखून अध्यापन आणि शिक्षणावर भर देण्यात येणार आहे तसेच शैक्षणिक प्रशासनामध्ये देखील तंत्रज्ञानाच्या वापराची समर्थन केलेले आहे.

**सार्वत्रिक प्रवेश आणि समानता :**

सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी तसेच भौगोलिक स्थानाचा विचार करुन सर्वांसाठी दर्जेदार शिक्षणाचा सार्वत्रिक प्रवेश निश्चित करणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे तसेच शिक्षणातील लिंग आणि सामाजिक अंतर भरून काढण्याचे उद्दिष्ट देखील आहेत.

**त्रिभाषीयता :**

मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्यावर भर देण्यात आलेला आहे. तसेच भाषांच्या शिक्षणासाठी मातृभाषा इंग्रजी आणि प्रादेशिक भाषा अशी त्रिभाषीय शिक्षण प्रणाली तयार करण्यात आलेली आहे.

**परीक्षा पद्धतीत बदल :**

निरंतर मूल्यमापन शिक्षण पद्धती बदलून वस्तूनिष्ठतेकडे लक्ष दिले जाणार आहे. तिसरी चौथी आठवी व बारावी या चार स्तरावरच्या परीक्षा पध्दतीत तपासताना विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिके शिक्षकच न तपासता विद्यार्थी पालक सहकारी विद्यार्थ्यांच्या अभिप्राय यांचा एकत्रित मूल्यमापन करून अंतिम मूल्यमापन करतील.

**अंमलबजावणीत सुस्पष्टता आणणे :**

सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेतून नवीन शैक्षणिक धोरण अमलात आणताना विद्यार्थी शिक्षक पालक यांच्या मानसिकतेमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे. राज्य जिल्हा तसेच तालुकास्तरीय वरील सर्व सहभाग धारकांना एकत्रित आणून तसेच सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करुन या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल एक महत्त्वाची बाब आहे. पारंपारिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षणापर्यंत चिकीत्सक विचारापर्यंत कडे जाण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील विद्यार्थी शिक्षक पालकांच्या दृष्टिकोनात बदल गरजेचे आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांचा निकाल हा सर्वांगीण विचार करून दिल्या जाईल या नवीन मूल्यमापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या स्वतःकडे समाजाकडे तसेच पालकाकडे बघण्याच्या दृष्टिकोन

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

सकारात्मक परिणाम होणार होण्यास मदत होणार आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आव्हाने :**

२१ व्या शतकातील भारतील समाज व्यवस्थेचा विचार करता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महत्वपुर्ण आहे. भविष्यकालीन गरजा व आव्हाने यावर मात करणेसाठी कार्यप्रणाली अस्तित्वात आलेली आहे. आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण काही टप्यावर कार्यान्वित देखिल करण्यात आलेला आहे. त्यासाठी शिक्षण संरंचना बदल करण्यात आली आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ देखिल त्याअनुरुप प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जेणेकरुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दिशा सुस्पष्ट होईल. या धोरणाचे उद्दिष्टे व ध्येयाची पुर्तता करणे शक्य होणार आहे. मात्र काही बाबी ह्या अजुनही आव्हानात्म आहे. त्यावर नियोजीत व पध्दतशीरपणे उपयायोजना करणे , नियोजन करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावर सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या सहा टक्के पर्यंत वाढवावा लागेल. त्यासाठी निधी सरकारने उपलब्ध करुन देणे हे आव्हान आहे. विविध आयोगाने शिफारश केल्याप्रमाणे किमान ६ टक्के निधीची तरतूद असावी मात्र ते अद्यापही पुर्ण झालेली नाही. त्यामुळे या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेसाठी ध्येय गाठणेसाठी आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता करण्याबाबत विचार केल्यास हे नक्कीच कठीण कार्य वाटते. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा कल हा खाजगी संस्थाकडे असलेला दिसून येतो. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नाविन्यपूर्ण कल्पना या देखिल या धोरणावर प्रभाव पाडणाऱ्या बाबी आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेत खाजगी क्षेत्राचे योगदान घेऊन त्यांना एक महत्त्वाचा भागीदार करणे हे देखील महत्त्वाचे आहे. या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी करताना शिक्षणावर खर्च वाढविणे गरजेचे आहे हे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केवळ पाठांतर करून पुस्तक विज्ञान मिळवण्यावर भर देत नाही तर त्यांना प्रात्यक्षिक गोष्टी शिकविल्या जातील. जीवन कौशल्य शिकविण्यावर भर दिल्या जाणार आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण हे कंटाळवाण‍े न वाटता उलट त‍े प्रत्येक गोष्ट आनंदाने शिकतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे पुढील पिढीसाठी व भारत राष्ट्राला विकसीत राष्ट्र बनविणेसाठी हितकारकच राहणार आहे.यातून देशाची अर्थव्यवस्था मजबूत होणार आहे .यात समाविष्ट करण्यात आलेल्या बदलामुळे विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनण्यास मदत होणार आहे.

**संदर्भसूची :**


- शैक्षणिक शिक्षण धोरण २०२०https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files /nep//2020MARATHI.pdf.
- बामणे विष्णू (२०१२),भारतीय शिक्षणाचे समाजातील अधिष्ठान, पुणे : नित्यनूतन प्रकाशन

- https://www.ijfmr.com/papers/2023/3/4133.pdf
- https://www.shikshanmitra.com/2021/09/New-Education-Policy-2020-in-Marathi.html
- हिरा आहेर (२०१०), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक ,नागपूर :डॉटसन पब्लिकेशन


*Cite This Article:*
**डॉ. पवार द.द. (2024).** *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी व आव्हाने.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number I, pp. 172–176). **ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10730169